ePaper


## केरळमध्ये फटाका कारखान्यात मोठा स्फोट; 13 जणांचा मृत्यू



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | बुधवार, दि. 22 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!




पान 9 वरुन...

पिंपरी-चिंचवडमधील नारीशक्तीचा मुंबईत 'आक्रोश'

## प्रचाराच्या सांगतेवेळी सुनेत्रा पवार यांचं मोठं विधान

# 'अजितदादांच्या अपघाताबाबत माझ्याही मनात शंका'







### सखोल तपासाची मागणी

अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेबाबत अनेकांच्या मनात शंका असून त्या शंकांचे निरसन होणे आवश्यक असल्याचे सुनेत्रा पवार यांनी स्पष्ट केले. निष्पक्ष आणि सखोल तपास व्हावा यासाठी केंद्र व राज्य स्तरावर प्रयत्न सुरू असल्याचे सांगत, दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

**महाईन्यूज । मुंबई**

**अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताबाबत तेव्हापासूनच अनेक शंका उपस्थित केल्या जात होत्या. मात्र सुनेत्रा पवार यांनी याबाबत अद्याप जाहीररीत्या कुठलंही विधान केलं नव्हतं. दरम्यान, आज पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेवेळी सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताबाबत पहिल्यांदाच जाहीरपणे मोठं विधान केलं आहे.**

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि राज्य सरकारी गट -ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ या दोन संघटनांनी संपासंदर्भात नोटीस दिली होती. सुधारीत निवृत्ती योजना १ मार्च २०२४ पासून लागू केली, मात्र त्याची अधिसूचना काढली नाही. परिणामी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना निवृत्तीविषय कोणतेही लाभ मिळत नाहीत, अशी संघटनाची मुख्य तक्रार असल्याचे सरकारी -निमसरकारी, शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीचे विश्वास काटकर म्हणाले.

राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रमुख अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ झालेल्या भीषण विमान अपघातात मृत्यू झाला होता. या अपघाताबाबत तेव्हापासूनच अनेक शंका उपस्थित केल्या जात होत्या. अजित पवार यांचे पुतणे रोहित पवार यांनी तर या अपघातावर वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. मात्र अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी याबाबत अद्याप जाहीररीत्या कुठलंही विधान केलं नव्हतं. दरम्यान, आज बारामती विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या सांगता सभेवेळी सुनेत्रा पवार यांनी अजित पवार यांच्या विमानाला झालेल्या अपघाताबाबत पहिल्यांदाच जाहीरपणे मोठं विधान केलं आहे. तसेच या अपघाताबाबत इतरांप्रमाणेच माझ्याही मनात शंका असल्याचं सुनेत्रा पवार यांनी म्हटलं आहे.

बारामती येथे प्रचारसभेला संबोधित करताना सुनेत्रा पवार म्हणाल्या की, अजितदादांच्या विमानाला झालेल्या दुर्दैवी अपघाताबाबत अनेकांच्या मनात शंका आहेत. ज्या शंका तुमच्या मनात आहेत, तशाच त्या माझ्याही मनात आहेत. या शंकांचं नक्कीच निरसन झालं पाहिजे. प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आपल्याला मिळालं पाहिजे. यासाठी मी पुढाकार घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनीही निष्पक्ष आणि सखोल तपासाचे आदेश दिले आहेत, अशी माहिती सुनेत्रा पवार यांनी दिली.

याबरोबरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही विधानसभेत जाहीर आश्वासन दिलेलं होतं. त्यामुळे या प्रकरणी विविध यंत्रणा आणि उच्चस्तरीय संस्थांच्या माध्यमातून याबाबत तपास सुरू आहे. मात्र या दुर्घटनेबाबतचं सत्य स्पष्टपणे समोर आलंच पाहिजे. काहीही चुकीचं आढळल्यास दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हावी, हीच तुमच्यासारखी माझीसुद्धा ठाम भूमिका आहे.

कोणत्याही बाबतीत आपण याबाबत तडजोड करणार नाही. याबाबत केंद्र आणि राज्य सरकारकडून पूर्ण सहकार्य मिळत आहे. त्यामुळे तुम्ही मनात कुठलीही शंका आणू नका, असे आवाहनही सुनेत्रा पवार यांनी यावेळी केले.

# पुण्यातील आयटीआय 'दक्ष' प्रकल्पात

## राज्यातील 54 शासकीय आयटीआयची निवड; उद्योगाभिमुख प्रशिक्षण, रोजगार संधी वाढणार

**महाईन्यूज । पुणे**

**शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा (आयटीआय) दर्जा उंचाविण्यासाठी दक्ष प्रकल्पांतर्गत राज्यातील 54 आयटीआयची 'दक्ष आयटीआय' म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यात अमरावती आणि पुणे विभागातील प्रत्येकी आठ, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, नागपूर या विभागातील प्रत्येकी दहा, नाशिक विभागातील सात संस्थांचा समावेश आहे.**



कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले. राज्यात दक्ष हा प्रकल्प 5 फेब्रुवारीपासून कार्यान्वित झाला आहे. 'हब अँड स्पोक्स क्लस्टर मॉडेल'अंतर्गत देशभरातील 'आयटीआय'चा दर्जा उंचाविण्यासाठी 'पीएम-सेतू' ही योजनाही सुरू करण्यात आली आहे. तसेच, राज्यातील शासकीय 'आयटीआय'च्या विकासासाठी 'आशियाई विकास बँके'कडून 'महादृष्टी' प्रकल्प भविष्यात प्रस्तावित आहे.

या तिन्ही योजनांच्या माध्यमातून राज्यातील शासकीय 'आयटीआय'चा दर्जा उंचाविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर, दक्ष प्रकल्पांतर्गत राज्यातील शासकीय 'आयटीआय'ची निवड करण्यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने 'औद्योगिक प्रशिक्षण संस्था क्रमवारी आराखडा' तयार केला. त्यात संस्थात्मक क्षमता, प्रशासन, शिक्षण, सक्षमीकरण, पर्यावरण, उद्योग सहभाग, विद्यार्थी समर्थन, प्रगती, समता, समावेशन, प्रशिक्षण आणि निकाल अशा 89 निकषांचा समावेश आहे. या निकषांसह प्रादेशिक समानतेचा विचार करून उत्तम आणि मध्यम श्रेणीतील 54 शासकीय 'आयटीआय'ची निवड करण्यात आली आहे. निवड केलेल्या 54 शासकीय 'आयटीआय'पैकी अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ या जिल्ह्यांतील प्रत्येकी दोन, बुलडाणा आणि वाशिम जिल्ह्यातील प्रत्येकी एक, छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, हिंगोली, जालना, लातूर, नांदेड, परभणी या जिल्ह्यांतील प्रत्येकी एका संस्थेचा समावेश आहे.

दक्ष प्रकल्पातून प्रामुख्याने पायाभूत सुविधांचे आधुनिकीकरण, उद्योगकेंद्रित अभ्यासक्रम, प्रारूप आयटीआयची निर्मिती, समावेशक संधी, विद्यार्थ्यांना प्लेसमेंट आणि शिकाऊ उमेदवारी (ॲप्रेंटीसशिप) व प्रशिक्षकांचा विकास करण्याचे उद्दिष्ट आहे.

### दोन संस्थांचा 'दक्ष'मध्ये समावेश

मुंबई विभागात मुंबई शहर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, ठाणे या जिल्ह्यांतील प्रत्येकी दोन, रायगड आणि पालघर या जिल्ह्यांतील प्रत्येकी एक, पुणे विभागांतर्गत पुणे, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येकी दोन, सातारा आणि सांगली जिल्ह्यातील प्रत्येकी एक, नाशिक विभागातील नाशिक, अहिल्यानगर, नंदूरबार जिल्ह्यातील प्रत्येकी दोन, जळगाव आणि धुळे जिल्ह्यातील प्रत्येकी एक, नागपूर विभागांतर्गत भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया जिल्ह्यातील प्रत्येकी दोन, तर नागपूर, गडचिरोली जिल्ह्यातील प्रत्येकी एक संस्था समाविष्ट केली आहे.

# महापालिकेचा माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारेंना कोर्टाचा दणका

**महाईन्यूज । पुणे**

**पुणे महानगरपालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांना सर्वोच्च न्यायालयाने मोठा दणका दिला आहे. सुमारे २००० कोटी रुपयांच्या बेहिशोबी मालमत्तेप्रकरणी त्यांच्याविरोधात सुरू असलेल्या चौकशीत हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला असून, त्यांची याचिका फेटाळून लावली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे वाघमारे यांच्यावरील भ्रष्टाचाराच्या आरोपांच्या सखोल चौकशीचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे.**




सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने वाघमारे यांची 'विशेष अनुमती याचिका' फेटाळून लावली. मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी दिलेल्या निकालात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही सबळ कारण नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

दरम्यान, २०१९ मध्ये तत्कालीन महापालिका आयुक्तांनी वाघमारे यांच्याविरुद्धची चौकशी करण्याचा प्रस्ताव फेटाळून लावला होता. मात्र, उच्च न्यायालयाने हा निर्णय रद्दबातल ठरवताना कडक ताशेरे ओढले होते. आयुक्तांनी चौकशीला परवानगी नाकारून एक प्रकारे 'मिनी ट्रायल' चालवली आणि सार्वजनिक सेवकाला वाचविण्याचा प्रयत्न केला, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले होते. उच्च न्यायालयाचा हाच निकाल सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवला आहे. त्यामुळे आयुक्तांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे.

### नेमके प्रकरण काय?

प्रशांत वाघमारे यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून उत्पन्नाच्या ज्ञात स्रोतांपेक्षा तब्बल २,००० कोटी रुपयांची अधिक मालमत्ता जमा केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. हे प्रकरण प्रथम २०१६ साली उघडकीस आले होते आणि त्यानंतर तपास यंत्रणांनी याची सखोल चौकशी सुरू केली. पुणे महापालिकेच्या भवन रचना विभागात महत्त्वाच्या पदावर कार्यरत असताना त्यांनी भ्रष्टाचार करून मोठ्या प्रमाणात संपत्ती जमा केल्याचे सांगितले जाते. तसेच, हा पैसा त्यांनी पत्नी आणि भावाच्या नावावर असलेल्या कंपन्यांमध्ये वळविल्याचा प्राथमिक निष्कर्ष नोंदवण्यात आला असून, या प्रकरणामुळे प्रशासनात मोठी खळबळ उडाली आहे.

### एसीबी चौकशी करण्यास पूर्णपणे स्वतंत्र

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे महाराष्ट्र लाचलुचपत प्रतिबंधक विभाग आता वाघमारे यांच्या मालमत्तेची चौकशी करण्यास स्वतंत्र आहे. वाघमारे यांनी तपासात सहकार्य न केल्याचा आणि महत्त्वाची आर्थिक कागदपत्रे लपविल्याचा दावा तपास यंत्रणांनी केला होता. आता या सर्व प्रकरणाचा पर्दाफाश होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# आयटीयन्सच्या समस्या सोडवण्यासाठी "आयटी स्टडी सेल" स्थापन होणार; आमदार शंकर जगताप

## कामगार मंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीमध्ये आमदारांच्या पाठपुराव्यामुळे आयटीयन्सना दिलासा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंजवडी तसेच राज्यातील आयटी पार्कमधील आयटीयन्सच्या नोकरीची असुरक्षितता, 'ले-ऑफ'च्या नावाखाली होणारी पिळवणूक आणि फ्रेशर्सची वाढती फसवणूक यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी राज्य शासनाकडून एका ' आयटी स्टडी सेल'ची स्थापना केली जाणार आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी या प्रश्नी घेतलेल्या पुढाकारामुळे आता आयटीयन्सचे प्रश्न थेट मुख्यमंत्री स्तरावर पोहोचले असून, लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडणार आहे.**



आयटीयन्सच्या विविध गंभीर समस्यांबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी (दि. २१ ) मंत्रालयात एक संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत आमदार शंकर जगताप यांनी आयटीयन्सया व्यथा मांडल्या. या वेळी कामगार मंत्री फुंडकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, आयटी क्षेत्रासाठी विशेष कायदे करणे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तज्ज्ञांचा समावेश असलेली आयटी स्टडी सेलची स्थापना करण्याचे निर्देश दिले.

या महत्त्वाच्या बैठकीला कामगार मंत्री आकाश फुंडकर, प्रधान सचिव (कामगार) आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त डॉ. एच. पी. तुम्मोड, अवर सचिव (कामगार-२) स्वप्रिल कापडणीस, अवर सचिव (उद्योग) अजित सासुळकर, अवर सचिव (IT) योगेश गोसावी, 'फोरम फॉर आयटी एम्प्लॉईज'चे पवनजित माने व प्रशांत पंडित, सहाय्यक कामगार आयुक्त वि. अ. नामदे आणि कक्ष अधिकारी (विधी) अश्विनी सैनी उपस्थित होते.

> “ आयटीयन्सना सध्या अनेक कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. "औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत आयटीयन्सची व्याख्या स्पष्ट नसल्याने त्यांना योग्य कायदेशीर संरक्षण मिळत नाही. त्यामुळे त्यांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणणे आवश्यक आहे. यासाठी उद्योग, कामगार आणि माहिती-तंत्रज्ञान या तिन्ही विभागांच्या समन्वयातून मार्ग काढण्यासाठी पावले उचलली जात आहेत.
>
> आयटी क्षेत्र हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मात्र, आयटीयन्सच्या नोकरीची सुरक्षा आणि कायदेशीर हक्कांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. यावर आता आयटी स्टडी सेल स्थापन करण्याचे आश्वासन कामगार मंत्र्यांनी दिले आहे. मुख्यमंत्री स्तरावर बैठक घेऊन लवकरच यावर ठोस कायदेशीर तरतूद केली जाईल.
>
> **- शंकर जगताप,**
> **आमदार, चिंचवड विधानसभा.**

आमदार शंकर जगताप यावेळी म्हणाले, राज्याच्या जीडीपीमध्ये आयटी क्षेत्राचा वाटा मोठा असला, तरी येथील आयटीयन्सच्या समस्यांकडे दुर्लक्ष होत आहे. आयटी कर्मचाऱ्यांची व्याख्या अधिक स्पष्ट करणे, त्यांना औद्योगिक विवाद अधिनियमांतर्गत संरक्षण मिळवून देणे आणि कंपन्यांकडून केल्या जाणाऱ्या ले-ऑफ थांबवण्यासाठी नियमावली तयार करण्यावर या 'स्टडी सेल'चा भर असेल. तसेच, आयटीयन्सच्या तक्रारींच्या जलद निवारणासाठी 'आयटी ट्रिब्युनल' स्थापन करण्याबाबतही चर्चा झाली.

### बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे

आयटीयन्सना निवृत्तीनंतरचे वेतन आणि नोकरी गेल्यानंतरचे लाभ मिळावेत यासाठी ईपीएफओ (EPFO) च्या माध्यमातून हस्तक्षेप करण्याचा प्रस्ताव, कंपन्यांमध्ये 'पॉश' (POSH) समिती आणि क्रंची फॅसिलिटी सुविधांची काटेकोर तपासणी, कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून काढून त्यांना 'ब्लॅकलिस्टेड' करण्याच्या प्रकारावर कायदेशीर निर्बंध आणण्याबाबत चर्चा करण्यात आली. मुख्य म्हणजे आयटीयन्सच्या तक्रारींचे जलद निवारण करण्यासाठी विशेष 'आयटी ट्रिब्युनल' किंवा फास्ट ट्रॅक लेबर कोर्ट येत्या जून अखेर सुरू होण्याबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले.

# स्वीकृत नगरसेवक निवड पुन्हा लांबणीवर; भाजपमधील मतभेद अडथळा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकांची निवड सोमवारच्या (दि.20) सर्वसाधारण सभेत करण्यात येणार होती. मात्र, ती सभा तहकूब झाल्याने स्वीकृत नगरसेवकांची निवड पुन्हा लांबणीवर पडली आहे. परिणामी, इच्छुकांची धाकधूक आणखी वाढली आहे.**

शेजारच्या पुणे महापालिकेत भाजपच्या स्वीकृत नगरसेवकांची यादी 9 मार्च 2026 ला जाहीर झाली. त्यानंतर सर्वसाधारण सभेत निवड प्रक्रियाही पूर्ण झाली आहे. मात्र, पिंपरी-चिंचवड शहरातील भाजपाच्या स्थानिक नेते व पदाधिकाऱ्यांमध्ये एकमत होत नसल्याने स्वीकृत नगरसेवकांचा तिढा अद्याप सुटलेला नाही. सात जागांसाठी तीनशेहून अधिक अर्ज इच्छुक असल्याने शहर भाजपाने स्वीकृत नगरसेवक निवडीचा निर्णय प्रदेश कमिटीवर सोपवला आहे. त्यात जुने विरुद्ध नवे, आमदार समर्थक विरुद्ध निष्ठावंत असा संघर्ष सुरू आहे.

दहा स्वीकृत नगरसेवकांपैकी राष्ट्रवादी काँग्रेसच्या तीन जणांची नावे आजच्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रिकेवर होती. त्यात माजी नगरसेवक राजेंद्र जगताप, माजी नगरसेविका सीमा सावळे, पक्षाचे पदाधिकारी फजल शेख यांचा समावेश आहे. या तीन नावाची निवड 4 मार्च 2026 ला झाली आहे. मात्र, त्यांच्या नावावर सर्वसाधारण सभेकडून अद्याप अधिकृत शिक्कामोर्तब झालेले नाही. त्यांची निवड सत्ताधारी भाजपामुळे अडकून पडली आहे.



भाजपात आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, अमित गोरखे, उमा खापरे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे असे प्रमुख गट आहेत. त्यांनी आपल्या समर्थकांची नावे सुचवली आहेत. दुसरीकडे भाजपातील एका गटाने ज्येष्ठ व निष्ठावंत अशी काही नावे सुचवली आहेत. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदुत्ववादी संघटनांच्या वतीनेही काही नावे सुचवली आहेत. माजी नगरसेवक आणि पराभूत नगरसेवकही स्वीकृत नगरसेवक होण्यास तीव इच्छुक आहेत. त्यामुळे कोणती नावे घ्यायची आणि कोणती गाळायची याबाब एकमत होत नाही. भाजपाकडे इच्छुकांची संख्या अधिक असल्याने नेमके कोणाला संधी द्यायची यावरून एकमत होत नाही आहे. ती नावे प्रदेश कमिटीकडे पाठविण्यात आली आहेत. नावे अंतिम करण्याची प्रक्रिया लांबणीवर पडली आहे. स्वीकृत नगरसेवकांच्या सात नावावर भाजपाचे एकमत झाल्याचा दावा सत्तारूढ पक्षतेने प्रशांत शितोळे यांनी केला होता. त्यामुळे आजच्या सभेत सात जणांची निवड होण्याची शक्यता होती. मात्र, ती सभाच तहबूक झाल्याने त्या निवडी पुन्हा लांबणीवर पडल्या आहेत. आता, 5 मे रोजीच्या तहकूब सभेकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.



भूमिका

# मणिपूरमधील होरपळ

**ईशान्य भारतातील मणिपूर राज्य सध्या पुन्हा एकदा वांशिक संघर्षाच्या ज्वाळांमध्ये होरपळताना दिसत आहे. कुकी आणि मैतेई समुदायांमधील दीर्घकाळापासूनचा तणाव आता अधिक तीव्र झाला असून त्यात नागा समुदायाचाही सहभाग वाढल्याने परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे.**




या संघर्षाने केवळ सामाजिक सलोखा ढासळवला नाही, तर राज्याच्या स्थैर्यालाही गंभीर धक्का दिला आहे. केंद्रात स्पष्ट बहुमताने सत्तेवर आलेल्या सरकारने ईशान्य भारताच्या विकासाला प्राधान्य दिले होते. पायाभूत सुविधा, संपर्क व्यवस्था आणि आर्थिक विकासासाठी अनेक उपक्रम राबवण्यात आले. मात्र, मणिपूरमधील वांशिक संघर्षावर तोडगा काढण्यात अद्याप अपेक्षित यश मिळालेले नाही. तीन वर्षांपासून सुरू असलेल्या हिंसाचारात शेकडो लोकांचा बळी गेला असून हजारो नागरिक विस्थापित झाले आहेत. यामुळे समाजात भीती, अविश्वास आणि द्वेषाची दरी अधिकच खोल झाली आहे.

या संघर्षामागे केवळ जातीय भावना नाहीत, तर राजकीय प्रतिनिधित्व, जमिनीचे हक्क, आरक्षण आणि आर्थिक संधी यांसारखे जटिल मुद्दे दडलेले आहेत. मैतेई समुदायाचा खोऱ्यातील प्रभाव आणि कुकी-झोमी समाजाचा डोंगराळ भागातील वर्चस्व यामुळे संसाधनांवरून संघर्ष तीव्र झाला आहे. या समस्येचे निराकरण केवळ लष्करी बळाच्या आधारावर होऊ शकत नाही, हे स्पष्ट आहे.

यात आणखी एक चिंताजनक पैलू म्हणजे परकीय शक्तींचा हस्तक्षेप. म्यानमार आणि चीनकडून फुटीरतावादी गटांना मिळणारा पाठिंबा, तसेच स्थानिक तरुणांमध्ये असंतोष पसरवण्याचे प्रयत्न, परिस्थिती अधिकच गंभीर बनवत आहेत. अशा प्रकारचे हस्तक्षेप केवळ मणिपूरपुरते मर्यादित नसून, जम्मू-काश्मीर आणि पंजाबसारख्या संवेदनशील भागांतही दिसून येतात. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनेही हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

मणिपूरचे भूराजकीय स्थान लक्षात घेता, तेथे दीर्घकाळ अस्थिरता राहणे देशासाठी परवडणारे नाही. 'चिकन नेक' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अरुंद भौगोलिक पट्ट्यामुळे ईशान्य भारताचा उर्वरित देशाशी संपर्क टिकून आहे. अशा परिस्थितीत कोणतीही अस्थिरता राष्ट्रीय एकात्मतेसाठी धोकादायक ठरू शकते. या पार्श्वभूमीवर सरकारने तटस्थ आणि संवेदनशील भूमिका घेत संवादाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. विविध समुदायांमधील विश्वास पुनर्स्थापित करण्यासाठी स्थानिक नेतृत्व, सामाजिक संघटना आणि नागरिकांचा सहभाग वाढवणे गरजेचे आहे. तरुणाईला सकारात्मक दिशादर्शन करून त्यांना मुख्य प्रवाहात आणणेही तितकेच महत्त्वाचे आहे. शेवटी, मणिपूरमधील शांतता आणि स्थैर्य ही केवळ एका राज्याची गरज नसून संपूर्ण देशाच्या सुरक्षिततेशी निगडित बाब आहे. सर्वंकष आणि दीर्घकालीन उपाययोजना राबवूनच या समस्येवर प्रभावी तोडगा काढता येईल. संवाद, विकास आणि विश्वास या त्रिसूत्रीवर भर दिल्यास मणिपूर पुन्हा शांततेच्या मार्गावर येऊ शकतो.

## प्रासंगिक »

### मोठेपण

**मॅक्समुल्लर हा जगप्रसिद्ध विद्वान, तत्त्ववेत्ता म्हणून ओळखला जातो. त्यांच्या आयुष्यातील ही कथा. मॅक्स-मुल्लर ज्या महाविद्यालयात शिकले, त्याच महाविद्यालयात पुढे त्यांची प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली.**

आपण ज्या ठिकाणी महाविद्यालयीन शिक्षण घेतले तेथेच अध्यापनाचे पवित्र कार्य करायला मिळणार याचा साहजिकच त्यांना खूप आनंद झाला होता.

त्या आनंदाच्या भरातच त्या दिवशी ते आपले पद स्वीकारायला गेले. ते महाविद्यालयात आले आणि ज्या खुर्चीसमोर येऊन उभे राहिले. क्षणभर त्या खुर्चीकडे पाहिले आणि शिपायांकडून दुसरी खुर्ची मागवून त्या खुर्चीशेजारी ठेवली व त्या दुसऱ्या खर्चीवर ते विराजमान झाले.

त्यांनी विचार केला की, 'या खुर्चीवर आपले प्राचार्य बसत होते. अद्याप आपण तितके मोठे झालो नाही. अजून आपणाला खूप शिकायचे आहे.

- तात्पर्य : कितीही मोठे झालात तरी तुमचे पाय जमिनीवर असू द्या. त्यामुळे तुमची विद्वत्ता, यश अधिक खुलते.

महाराष्ट्र पोलिस दलातील बदल्या आणि नियुक्त्यांभोवती निर्माण होणारे वाद नवीन नाहीत; मात्र अलीकडे मुंबई मॅटने दिलेल्या निर्णयामुळे या प्रक्रियेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

# पोलिस बदल्यांतील पारदर्शकतेचा प्रश्न आणि मॅटचा धक्का

कोल्हापूर येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या निरीक्षकांच्या मध्यावधी बदलीप्रकरणी मॅटने दिलेला 'जैसे थे' आदेश हा केवळ एका अधिकाऱ्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण पोलिस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर भाष्य करणारा ठरतो.

मॅटने या प्रकरणात नियमबाह्य बदली, पारदर्शकतेचा अभाव आणि राजकीय दबाव यांसारखे गंभीर आरोप नोंदवत प्रशासनावर ताशेरे ओढले. विशेष म्हणजे, या प्रकरणाचा अहवाल गृहविभाग आणि पोलिस महासंचालकांना सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले. यामुळे बदल्यांच्या प्रक्रियेत सुरू असलेल्या कथित गैरप्रकारांवर अधिकृत शिक्कामोर्तब झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

पोलिस दलातील बदल्या हा केवळ प्रशासकीय विषय नसून त्यामागे राजकीय हस्तक्षेप, आर्थिक व्यवहार आणि सत्तासंतुलन यांचा गुंता असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. जिल्हास्तरावर आणि




आयुक्तालयांमध्ये 'सोयीचे' अधिकारी बसवण्यासाठी आस्थापना मंडळाला बगल देणे, कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी ठाणेदारांची बदली करणे, किंवा दबाव टाकून निर्णय बदलवणे, या प्रकारांची चर्चा उघडपणे होत असते. यातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे, या प्रक्रियेविरोधात उभे राहण्याचे धाडस फारच कमी अधिकारी दाखवतात. कारण, विरोध केल्यास त्यांना दुय्यम पदांवर टाकणे, साइड ब्रँचला बदली करणे किंवा अन्य प्रकारे त्रास देणे, अशी भीती असते. परिणामी, अन्यायकारक निर्णयांना नाइलाजाने मान्यता देण्याची प्रवृत्ती वाढते. क्राइम ब्रँच किंवा स्थानिक गुन्हे शाखेतील नेमणुका हा या व्यवस्थेतील सर्वाधिक संवेदनशील मुद्दा आहे. या पदांसाठी ठरवलेले निकष स्पष्ट असतानाही त्याचे पालन अनेकदा होत नाही. वरिष्ठतेकडे दुर्लक्ष करून कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे, बाह्य दबावाखाली निर्णय घेणे, अशा विसंगतींमुळे दलाची कार्यक्षमता बाधित होते. या पार्श्वभूमीवर मॅटचा निर्णय हा एक प्रकारे 'वेक-अप कॉल' ठरू शकतो. मात्र, केवळ न्यायालयीन निरीक्षणांवर अवलंबून राहून परिस्थिती बदलणार नाही. गृहविभागाने आणि पोलिस नेतृत्वाने स्वतःहून पारदर्शक, नियमबद्ध आणि उत्तरदायी यंत्रणा उभारणे अत्यावश्यक आहे.

शेवटी, पोलिस दल हे कायदा व सुव्यवस्थेचे प्रतीक आहे. त्याच व्यवस्थेत जर अन्याय, अपारदर्शकता आणि दबावाचे राजकारण दिसत असेल, तर जनतेचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे बदल्यांची प्रक्रिया स्वच्छ आणि निष्पक्ष करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून लोकशाहीच्या सुदृढतेसाठी आवश्यक पाऊल आहे.

## ।। अभंगवाणी ।।



ओलें मूळ भेदी खडकाचें अंग ।
आभ्यासासी सांग कार्यसिद्धी ॥१॥

नव्हे ऐसें कांहीं नाहीं अवघड ।
नाहीं कईवाड तोंच वरि ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शरद पवार यांना सक्तीची विश्रांती!

## बारामती पोट निवडणुकीत मतदान करणार नाही; शरद पवार

महाईन्यूज । पुणे

**राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जानेवारी महिन्यात निधन झाले. त्यांच्या निधनामुळे बारामती विधानसभा मतदारसंघातील जागा रिक्त झाल्याने याठिकाणी निवडणूक आयोगाने पोटनिवडणूक जाहीर केली. २३ एप्रिल रोजी येथे पोटनिवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्याकरता आज बारामतीत प्रचारासाठी शेवटचा दिवस आहे.**



### सुनेत्रा पवारांना मतदान करा

“आमच्या पक्षाने (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष – शरदचंद्र पवार) या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना पाठिंबा जाहिर केला आहे. स्व. अजित पवार यांना ही एकप्रकारे आमच्या पक्षातर्फे श्रद्धांजलीच आहे. माझे बारामतीमधील सर्व मतदारांना आवाहन आहे की, त्यांनी श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करून स्व. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करावी. बारामतीमधील मतदार यांनी माझ्यावर प्रदीर्घ विश्वास ठेवलेला आहे. ते या आवाहनास प्रतिसाद देतील, असा मला विश्वास आहे”, असंही ते म्हणाले.

सर्वाधिक मतांनी निवडून येण्याकरता महायुती आणि महाविकास आघाडीतील अनेक नेते सुनेत्रा पवारांच्या पाठीशी उभे राहिले आहेत. मात्र, यात सुनेत्रा पवार यांचे सासरे आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते शरद पवार मतदानाकरता येऊ शकणार नाहीत. याबाबत आज खुद्द शरद पवारांनीच माहिती दिली. त्यांनी सोशल मीडियावरून यासंदर्भात पोस्ट केली आहे.

“मी १९६७ मध्ये लढविलेल्या पहिल्या निवडणुकीपासून बारामती मतदारसंघातील माझ्या मतदानाचा हक्क अखंडपणे बजावला. आता २०२६ मध्ये बारामती विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्राचे एक लाडके व लोकप्रिय नेते स्व. अजित पवार यांच्या दुर्दैवी, अपघाती निधनाच्या शोकात्म पार्श्वभूमीवर ही पोटनिवडणुक होत आहे”, असं शरद पवार म्हणाले.

ते पुढे म्हणाले, “या पोटनिवडणुकीसाठी बारामती येथे येऊन आतापर्यंतच्या प्रघातानुसार मतदान करण्याचे मी ठरवले होते. दुर्दैवाने माझी प्रकृती बिघडल्याने मला मुंबईत रुग्णालयात दाखल व्हावे लागले. डॉक्टरांनी मला उपचार आणि सक्तीची विश्रांती या कारणास्तव मुंबईबाहेर जाण्यास मनाई केली आहे. त्यामुळे अत्यंत नाईलाजास्तव मतदानाचा हक्क बजावण्यापासून मला वंचित रहावे लागत आहे, हे मी अत्यंत व्यथित आणि खेदपूर्ण अंत:करणाने सांगू इच्छितो. माझ्यावर अथक प्रेम व विश्वास असलेले बारामतीचे नागरिक, मतदार व कार्यकर्ते मला समजुन घेतील याची मी खात्री बाळगतो.”




“मतदानासाठी प्रत्यक्ष न येता निवडणूक आयोगाच्या विविध पर्यायांचा देखील मी तपास केला व विचारणा केली. परंतु ते पर्याय उपलब्ध नसल्याचे राज्याच्या निवडणूक अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. अखेर अतिशय व्यथित व जड अंत:करणाने मला मतदानापासून दूर राहण्याचा निर्णय करावा लागला. या पोटनिवडणुकीत श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांना मतदान करावे, असे मी बारामतीकरांना पुन्हा एकदा आवाहन करतो”, अशी माहिती शरद पवारांनी आज दिली.

या पार्श्वभूमीवर शरद पवार यांच्या अनुपस्थितीची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. तसेच, अजित पवार यांच्या निधनानंतर होणाऱ्या या पोटनिवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या निवडणुकीत सुनेत्रा पवार यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांनी जोरदार प्रयत्न सुरू केले असून वातावरण अधिकच चुरशीचे बनले आहे.

## पीडित तरुणींना रोजा ठेवण्यासह नमाज पठणाचाही व्हायचा आग्रह

महाईन्यूज । नागपूर

**धार्मिक चालीरीतींचे पालन करण्यासाठी दबाव आणत कर्मचारी तरुणींना धमकी देणाऱ्या एनजीओ चालक मो. रियाज मो. फाझील काझीच्या अटकेनंतर खळबळ उडाली आहे. हे प्रकरण समोर आल्यावर यातील आणखी तपशील बाहेर आले आहेत. आरोपी काझीकडे काम करणाऱ्या सर्व तरुणी या हिंदू होत्या.**



### वाढदिवशी केला होता एका तरुणीचा विनयभंग

आरोपी रियाझ काझीने दोन वर्षांपूर्वी वाढदिवसाच्या निमित्ताने त्याच्या एनजीओतील एका तरुणीचा विनयभंग केला होता. तिला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्याच्या नावाखाली त्याने तिला जबरदस्तीने आलिंगन देत सलगी करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर सातत्याने तो तिची मानसिक छळणूक करीत होता. तो वारंवार तिच्या जवळ जाण्याचे बहाणे शोधायचा व तिला एकटीला केबिनमध्ये बोलवायचा. त्याने नंतर तिच्याशी धार्मिक विषयांवर बोलण्यास सुरुवात केली.

एकीकडे त्याने केलेला विनयभंग व दुसरीकडे धार्मिक दबाव यामुळे या प्रकरणात पोलिस आता विविध दिशांनी तपास करीत आहेत.

रियाझ काझी (४८) हा फिकर फाउंडेशन व 'पढे हम - पढाए हम' या नावांनी स्वयंसेवी संस्था चालवतो. जुलै २०२४ मध्ये त्याने एनजीओमध्ये काम करणाऱ्या एका तरुणीचा विनयभंग केला होता. तरुणीने त्याला समज दिली होती; मात्र, तरीदेखील तो वारंवार तिची छेड काढत होता. दरम्यान, त्याच्या कार्यालयातील तरुणींना तो वारंवार त्याच्याशी निगडित धार्मिक चालीरीतींचे पालन करण्याचा आग्रह करायचा. तुम्ही रमजानमध्ये रोजा ठेवा किंवा नियमितपणे नमाज पठण करा, असे तो त्यांना म्हणायचा.

काही दिवसांपूर्वी त्याने काम सोडून गेलेल्या एका तरुणीच्या आईला फोन केला व इतर मुलींविषयी आक्षेपार्ह भाषेचा वापर केला. हा प्रकार कळताच तरुणी एकत्रित आल्या व थेट पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी काझीविरोधात गुन्हा दाखल करीत त्याला अटक केली. त्याची सखोल चौकशी सुरू आहे, अशी माहिती मानकापूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार हरीश काळसेकर यांनी दिली. काझीने एक बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार केला होता आणि तो महिला कर्मचाऱ्यांच्या सोशल मीडियातील हालचालींवर बारीक लक्ष ठेवायचा.

# जंगलमहल भागातील ४० जागांवर कोणाचा प्रभाव?

## मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची तृणमूल काँग्रेस आणि भाजपा यांच्यात थेट संघर्ष

**महाईन्यूज । पश्चिम बंगाल**

**पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत. जंगलमहल या भागात ममता बॅनर्जींच्या तृणमूल काँग्रेस व भाजपामध्ये जोरदार लढत होण्याची शक्यता आहे. झाडग्राम, पश्चिम मेदिनीपूर, पुरूलिया आणि बंकुरा या जिल्ह्यांचा जंगलमहल भागात समावेश होतो. जंगलमहल हा भाग एकेकाळी डाव्या पक्षांचा बालेकिल्ला होता.**



त्यानंतर हा भाग माओवाद्यांचा गड झाला. २०११ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसने (टीएमसी) जंगलमहलवर वर्चस्व प्रस्थापित केले. आता या भागात तृणमूल काँग्रेसचे वर्चस्व आहे. भाजपाने जंगलमहल ताब्यात घेण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

पश्चिम बंगालमध्ये निवडणूक आयोगाकडून मतदारयाद्यांची फेरतपासणी (एसआयआर) करण्यात आली आहे. त्यामुळे अनेक मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आल्याचा मुद्दा सध्या पश्चिम बंगालच्या राजकारणात वादग्रस्त ठरला आहे. परंतु, जंगलमहल भागात एसआयआर प्रक्रियेतून खूपच कमी मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. एसआयआर प्रक्रियेतून जंगलमहल भागातील ४० विधानसभा मतदारसंघांतून ५ हजारांहून कमी मतदारांची नावे वगळण्यात आली आहे. जंगलमहल भागात आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या भागात घेतलेल्या प्रचार सभांमध्ये द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्यात पश्चिम बंगाल सरकारकडून झालेल्या निष्काळजीपणावर भाष्य केले. 'आदिवासींचा अपमान' झाल्याची टीका नरेंद्र मोदींनी केली होती.

आदिवासींशी संबंधित नववी आंतरराष्ट्रीय संथाल परिषद उत्तर बंगालमध्ये ७ मार्च रोजी आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या स्वागतासाठी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी अथवा सरकारमधील कोणीही मंत्री उपस्थित नव्हते. त्यामुळे मुर्मू यांनी पश्चिम बंगाल सरकारवर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. पश्चिम बंगाल सरकारकडून राष्ट्रपतींच्या कार्यक्रमाचे ठिकाणी सुरक्षेच्या कारणास्तव ऐनवेळी बदलण्यात आले होते. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपावर आदिवासींच्या मुद्द्यावरून हल्लाबोल केला आहे. भाजपाच्या जाहीरनाम्यात समान नागरी कायदा लागू करणार असल्याचे नमूद आहे. समान नागरी कायद्यावरून बॅनर्जी यांनी भाजपावर जोरदार टीका केली. मेदिनीपूर येथे झालेल्या सभेत ममता बॅनर्जी म्हणाल्या, "भाजपाच्या जाहीरनाम्यात समान नागरी कायद्याबद्दल सांगण्यात आले आहे. समान नागरी कायदा लागू झाल्यास धार्मिक आचरण व तुमच्या श्रद्धांवर घाला घातला जाईल. तुमची संस्कृती, परंपरा आणि शिक्षण तुमच्याकडून हिरावून घेतले जाईल. समान नागरी कायदा विविधतेला उद्ध्वस्त करतो. त्यांना सगळं काही एकसंध करायचं आहे. आम्ही समान नागरी कायद्याला विरोध करू कारण तो धोकादायक आहे", असे ममता बॅनर्जी म्हणाल्या होत्या.

### जंगलमहल भागातील पक्षीय बलाबल किती?

जंगलमहल भागात लोकसभेच्या एकूण ६ जागा आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने ५ जागा जिंकल्या, तर टीएमसीने फक्त एक जागा जिंकली होती. जंगलमहल भागात विधानसभेच्या एकूण ४० जागा आहेत. २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेस दमदार कामगिरी करत २४ जागा जिंकल्या होत्या, तर भाजपाला १६ जागा जिंकता आल्या होत्या. भाजपाने पुरूलिया आणि बंकुरा या जिल्ह्यांमध्ये चांगली कामगिरी केली होती. तर झाडग्राम आणि पश्चिम मेदिनीपूरमध्ये भाजपाला दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता.

# मी इराणमधील सत्ता बदलली; लवकरच मोठा करार होऊ शकतो

**महाईन्यूज । वॉशिंग्टन**

**मी इराणमधील सत्ता बदलली आहे. अमेरिका आणि इराणमध्ये लवकरच एक मोठा करार होऊ शकतो. सध्याच्या परिस्थितीत इराणकडे तडजोड करण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरलेला नाही, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला.**



डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविषयी अत्यंत आक्रमक भूमिका घेत, लवकरच अमेरिका आणि इराण यांच्यात मोठा करार होऊ शकतो, असा दावा केला आहे. त्यांच्या मते, इराणमध्ये सत्तांतरानंतरची परिस्थिती पूर्णपणे बदलली असून, सध्याच्या घडीला इराणकडे तडजोड करण्याशिवाय कोणताही पर्याय उरलेला नाही. ट्रम्प यांनी स्पष्ट शब्दांत इशारा देत सांगितले की, जर करार झाला नाही तर अमेरिकन लष्कर कोणत्याही क्षणी हल्ल्यासाठी सज्ज आहे आणि आदेश मिळताच तातडीने कारवाई केली जाईल.

ट्रम्प यांनी असेही नमूद केले की, युद्धविरामाच्या कालावधीत अमेरिकेने आपली लष्करी ताकद मोठ्या प्रमाणात वाढवली आहे. अत्याधुनिक शस्त्रसाठा, मोठ्या प्रमाणात दारूगोळा आणि तांत्रिक सज्जता यामुळे अमेरिका कोणत्याही संघर्षासाठी पूर्णपणे तयार आहे. "माझ्याकडे जास्त वेळ नाही," असे म्हणत त्यांनी इराणवर दबाव वाढवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे दोन्ही देशांमधील तणाव अधिक तीव्र होताना दिसत आहे.

दरम्यान, अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी वेंस पाकिस्तान दौऱ्यावर रवाना होणार आहेत. त्यांच्या सोबत विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे जावई जेरेड कुशनर हे देखील सहभागी होणार आहेत. या दौऱ्यादरम्यान प्रादेशिक सुरक्षेचे प्रश्न, मध्यपूर्वेतील तणाव आणि संभाव्य राजनैतिक घडामोडींवर चर्चा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या भेटीकडे आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या उत्सुकतेने पाहिले जात आहे.

दुसरीकडे, इराण ने अमेरिकेवर युद्धविरामाचे उल्लंघन केल्याचा गंभीर आरोप केला आहे. इराणच्या लष्कराच्या म्हणण्यानुसार, ओमानच्या आखातात एका अमेरिकन युद्धनौकेने इराणी ध्वज असलेल्या मालवाहू जहाजावर गोळीबार केला. अमेरिकेने हे जहाज त्यांच्या सागरी नाकेबंदीला चुकवण्याचा प्रयत्न करत होते, असा दावा केला आहे. मात्र, इराणने या कारवाईला 'चाचेगिरी' असे संबोधत ती युद्धविरामाच्या नियमांचे उल्लंघन असल्याचे ठामपणे सांगितले आहे. या परस्पर आरोप-प्रत्यारोपांमुळे दोन्ही देशांतील तणाव अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष आता या घडामोडींवर केंद्रित झाले असून, पुढील काही दिवसांत या परिस्थितीचा कोणता मार्ग निघतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### इराणचा अमेरिकेवर सीजफायर उल्लंघनाचा आरोप

अमेरिकेने सीजफायरचे उल्लंघन केल्याचा आरोप केल्यानंतर आता इराणनेही पलटवार केला आहे. इराणच्या लष्कराने म्हटले आहे की, खुद्द अमेरिकेनेच युद्धविराम मोडला आहे. रविवारी ओमानच्या आखातात एका अमेरिकन युद्धनौकेने इराणचा ध्वज असलेल्या मालवाहू जहाजावर गोळीबार केला. अमेरिकेचा असा दावा आहे की, हे जहाज त्यांच्या सागरी नाकेबंदीतून निसटण्याचा प्रयत्न करत होते. याला प्रत्युत्तर म्हणून इराणच्या लष्कराने ही कारवाई म्हणजे 'चाचेगिरी' असल्याचे म्हटले असून हे सीजफायरचे उल्लंघन असल्याचे सांगितले आहे.

# कल्की कोचलिनने 'त्या' घटनेनंतर झालेल्या मानसिक आरोग्याबाबत केला खुलासा



ये जवानी है दिवानी या चित्रपटामुळे अभिनेत्री कल्की कोचलिन हिला मोठी लोकप्रियता मिळाली. या चित्रपटातील 'आदिती' ही तिची व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली होती. तिच्या अभिनयातील सहजता, प्रामाणिकपणा आणि मोकळेपणामुळे ती प्रेक्षकांच्या मनात घर करून गेली. आजही ती चित्रपटसृष्टीत सक्रिय असली, तरी ती आपल्या कुटुंबासह गोवा येथे वास्तव्यास आहे. मुंबईच्या धावपळीच्या आणि झगमगाटाच्या जीवनापासून दूर राहण्याचा तिने जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.

नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये कल्कीने तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल आणि मानसिक आरोग्याबद्दल स्पष्टपणे भाष्य केले. अनुराग कश्यप यांच्यासोबत झालेल्या घटस्फोटानंतर ती मोठ्या मानसिक तणावातून गेली होती. त्या काळात तिला निद्रानाशासारख्या समस्यांचा गंभीर सामना करावा लागला. अनेक महिने तिला व्यवस्थित झोप लागत नव्हती. रात्री दोन-तीन वाजता जाग येणे आणि त्यानंतर पुन्हा झोप न लागणे, हा तिच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनला होता. अशा वेळी ती गिटार वाजवणे किंवा स्वतःला इतर कामांमध्ये गुंतवून ठेवणे, यामुळे मन शांत ठेवण्याचा प्रयत्न करत असे. कल्कीने आपल्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात २००९ मध्ये देव डी या चित्रपटातून केली. या चित्रपटात तिने सहाय्यक अभिनेत्रीची भूमिका साकारली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनुराग कश्यप यांनी केले होते आणि याच चित्रपटातून तिची बॉलिवूडमध्ये एंट्री झाली. कामाच्या निमित्ताने दोघांमध्ये जवळीक निर्माण झाली आणि २०११ मध्ये त्यांनी विवाह केला. मात्र, काही वैयक्तिक कारणांमुळे हे नाते फार काळ टिकू शकले नाही आणि २०१३ मध्ये त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. घटस्फोटानंतर कल्की इस्रायलमधील गाय हर्षबर्गसोबत नात्यात होती. या नात्यातून तिला 'सॅफो' नावाची मुलगी झाली. मुलीच्या जन्मानंतर काही वर्षांनी, २०२४ मध्ये कल्कीने गाय हर्षबर्गसोबत विवाह केला आणि आपल्या नव्या आयुष्याची सुरुवात केली. या जोडप्याने त्यांच्या नात्याची अधिकृत घोषणा देखील केली. कल्की कोचलिन ही नेहमीच स्वतःच्या अटींवर आयुष्य जगणारी अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. तिच्या आयुष्यातील चढ-उतारांना तिने धैर्याने सामोरे जात स्वतःला अधिक मजबूत बनवले आहे.

तिचा स्पष्टवक्तेपणा, स्वातंत्र्यप्रिय स्वभाव आणि प्रामाणिक दृष्टिकोन यामुळे ती इतरांपेक्षा वेगळी ठरते. तिच्या आयुष्यात आलेल्या कठीण प्रसंगांमधून ती अधिक मजबूत बनली आहे. मानसिक आरोग्याबद्दल खुलेपणाने बोलण्याची तिची तयारी अनेकांसाठी प्रेरणादायी ठरते. समाजात अजूनही या विषयाकडे दुर्लक्ष केले जाते, अशा वेळी तिचा आवाज महत्त्वाचा ठरतो. कल्कीने नेहमीच वेगळ्या धाटणीच्या भूमिका स्वीकारत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. मुख्य प्रवाहातील चित्रपटांसोबतच ती प्रयोगशील सिनेमांमध्येही सक्रिय आहे. तिच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक आयुष्यातील संतुलन अनेकांसाठी आदर्श मानले जाते. आगामी काळातही ती आपल्या अभिनयातून प्रेक्षकांचे मनोरंजन करत राहील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



# रितेशला मी अभिनेत्री म्हणून पसंत नसावी

रितेश देशमुख दिग्दर्शित 'राजा शिवाजी' ( RAJA SHIVAJI) हा बहुचर्चित चित्रपट १ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत असून नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर रिलीज झाला आहे. महाराष्ट्राचे आराध्यदैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची शौर्यगाथा 'राजा शिवाजी' या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर मांडण्यात येत आहे. या चित्रपटात अभिनेत्री विद्या बालन 'बडी बेगम' भूमिका साकारणार आहे. या ट्रेलर लॉंच सोहळ्यात विद्या बालनने एक किस्सा शेअर केला आहे. याशिवाय तिने या चित्रपटाचा भाग असण्याबाबत आनंदही व्यक्त केला आहे. पुढे ती म्हणाली, "मला तुम्हाला एक खरं सांगायचं आहे. जेव्हा मला समजलं की छत्रपती शिवाजी महाराजांवर मराठी चित्रपट बनतोय आणि तो रितेश करत आहे. तेव्हा माझ्या मनात आलं की छान. संजू करत आहे, अभिषेक करत आहे पण रितेश माझ्याकडे का आला नाही? मग वाटलं, कदाचित माझ्यासाठी काही रोल नसेल किंवा त्याला मी अभिनेत्री म्हणून पसंत नसावी."



# आजोबांच्या आठवणींनी भावूक झाली अनीत पड्डा

सैयारा चित्रपटातून प्रसिद्धी मिळवलेली अभिनेत्री अनीत पड्डा सध्या खूप कठीण काळातून जात आहे. तिच्या आजोबांचे नुकतेच निधन झाले असून, ही दुःखद बातमी तिने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत चाहत्यांना दिली. या पोस्टमध्ये तिने आजोबांसोबत घालवलेल्या सुंदर आठवणींना उजाळा दिला आहे. अनीतने इंस्टाग्रामवर लिहिलेल्या पोस्टमध्ये ती म्हणते, "तुम्ही माझ्या आयुष्यातील सर्वात खास व्यक्ती होता. ती पुढे लिहिते, "आपण एकत्र घालवलेले सर्व क्षण मी कायम जपून ठेवेन.



# आयुष म्हात्रे आयपीएलमधून बाहेर

## चेन्नई सुपर किंग्स संघासाठी मोठा धक्का

**महाईन्यूज । चेन्नई**



**दमदार फॉर्मात असणारा युवा धडाकेबाज फलंदाज आयुष म्हात्रे उर्वरित आयपीएल हंगामात खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. चेन्नई सुपर किंग्स संघासाठी हा मोठा धक्का आहे.**

यंदाच्या हंगामात आयुषने चेन्नईसाठी सर्वाधिक धावा केल्या आहेत. १८वर्षीय आयुषला सनरायझर्स हैदराविरुद्धच्या लढतीत मांडीच्या स्नायूंना दुखापत झाली होती. चेन्नईच्या फिजिओंनी मैदानात धाव घेत त्याच्यावर उपचार केले होते. त्यानंतर आयुष पुन्हा खेळण्यासाठी सज्ज झाला. कर्णधार ऋतुराज गायकवाडने एकेरी धाव घेतली. मात्र दुखापत गंभीर असल्याने आयुषने लंगडत कशीबशी ही धाव पूर्ण केली. तो रनआऊट होता होता वाचला. फिजिओ पुन्हा मैदानात आले. मात्र त्याला खेळता येणार नसल्याचं स्पष्ट झालं.

आयुषची दुखापत बरी होण्यासाठी ६ ते १२ आठवड्यांचा कालावधी लागणार असल्याने उर्वरित हंगामात तो खेळू शकणार नाही असं चेन्नई सुपर किंग्सने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. चेन्नईचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी पायाला झालेल्या दुखापतीमुळे या हंगामात एकही सामना खेळू शकलेला नाही. मधल्या फळीतील आक्रमक फलंदाज डेवाल्ड ब्रेव्हिसही काही सामने दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. डावखुरा वेगवान गोलंदाज खलील अहमद दुखापतग्रस्त झाल्याने उर्वरित हंगामात खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं होतं. त्यातच आयुषची भर पडल्याने चेन्नईच्या अडचणी वाढल्या आहेत.




# आयपीएलनंतर भारत-अफगाणिस्तान कसोटीचे आव्हान!

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भारतात सध्या आयपीएल २०२६ स्पर्धेचा थरार सुरू आहे. ही स्पर्धा झाल्यानंतर भारतीय संघ अफगाणिस्तानविरूद्ध एकमात्र कसोटी सामना खेळण्यासाठी मैदानात उतरणार आहे. पण मुख्य बाब म्हणजे हा कसोटी सामना वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेचा भाग नसणार आहे. त्यामुळे हा सामना जिंकूनही भारतीय संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेत गुण दिले जाणार नाही.**

दरम्यान या मालिकेतून जसप्रीत बुमराह आणि शुबमन गिल यांना विश्रांती दिली जाऊ शकते. हा सामना वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेचा भाग नसणार आहे. त्यामुळे सामना जिंकूनही गुण मिळणार नाहीत. त्यामुळे भारताचा नंबर १ गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि संघाचा कर्णधार शुबमन गिलला या कसोटीत विश्रांती दिली जाऊ शकते. दोघांना विश्रांती देण्याचं एकमेव कारण म्हणजे, दोघेही २ महिने आयपीएल स्पर्धा खेळणार आहेत. त्यामुळे दोघेही थकलेले असतील. हा सामना झाल्यानंतर भारतीय संघाला काही महत्वाच्या वनडे मालिका देखील खेळायच्या आहेत.

भारत आणि अफगाणिस्तान यांच्यात होणारा कसोटी सामना ६ जूनपासून खेळवला जाणार आहे. या सामन्यासाठी कोणाला संधी मिळणार, हे कोणता संघ प्लेऑफ फेरी गाठणार यावर अवलंबून असेल. जर मुंबई इंडियन्सने प्लेऑफमध्ये प्रवेश केला नाही, तर त्याला विश्रांतीसाठी पुरेसा वेळ मिळेल. त्यामुळे त्याला कसोटी संघात स्थान दिले जाऊ शकते. पण जर मुंबईचा संघ प्लेऑफमध्ये पोहोचला, तर बुमराहला विश्रांती दिली जाऊ शकते. बुमराहला विश्रांती दिल्यानंतर एखाद्या युवा खेळाडूला संधी दिली जाऊ शकते.

आयपीएलचा अंतिम सामना झाल्यानंतर लगेच एका आठवड्यानंतर हा कसोटी सामना खेळवला जाणार आहे. त्यामुळे निवड समिती आणि संघ व्यवस्थापक खेळाडूंवर कुठलाही ताण येणार नाही, याची काळजी घेतील. हा कसोटी सामना झाल्यानंतर, तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका आणि त्यानंतर इंग्लंडमध्ये मर्यादीत षटकांच्या मालिकेचा थरार देखील रंगणार आहे. हा कसोटी सामना जिंकून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमध्ये गुण मिळणार नाहीत. त्यामुळे खेळाडूंचं वर्कलोड मॅनेज करण्यासाठी निवड समिती प्रमुख खेळाडूंना विश्रांती देऊ शकते.



स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

। बुधवार ।
दि. 22 एप्रिल 2026 ।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## भाजपा शहराध्यक्ष काटे यांच्या नेतृत्वात शेकडो महिलांचा आंदोलनात सहभाग

# पिंपरी-चिंचवडमधील नारीशक्तीचा मुंबईत 'आक्रोश'

महाईन्यूज ।
पिंपरी- चिंचवड

**नारीशक्तीचा अपमान करणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी पिंपरी-चिंचवडमधील महिलांनी मुंबईत 'आक्रोश आंदोलन' छेडले आहे. भाजपा शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या आज सकाळी मुंबईकडे रवाना झाल्या.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या महिला आरक्षणाच्या निर्णयाला विरोध करणाऱ्या पक्षांविरोधात महिलांमध्ये संतापाची लाट उसळली असून, त्याच पार्श्वभूमीवर हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. 'नारी-शक्ती वंदन अधिनियम' या महिला आरक्षणाच्या ऐतिहासिक विधेयकाला विरोध करून विरोधकांनी महिलांविरोधी मानसिकता दाखविल्याचा आरोप करण्यात आला.

महिलांच्या हक्कांसाठी आवाज बुलंद करण्याच्या उद्देशाने मुंबईतील वरळी येथील जांबोरी मैदानावर या 'आक्रोश आंदोलनाचे' आयोजन करण्यात आले. पिंपरी-चिंचवड शहरातून मोठ्या संख्येने महिला या आंदोलनात सहभागी झाल्या असून, सकाळपासूनच त्या मुंबईच्या दिशेने रवाना झाल्या आणि आंदोलनात सहभागी झाल्या.

या आंदोलनास राज्याचे नेते तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाचा उल्लेख आयोजकांनी केला आहे. केंद्र सरकारने महिलांना आरक्षण देऊन सन्मानित केले असताना, केवळ राजकीय स्वार्थापोटी काही पक्ष त्याला विरोध करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

"देशातील नारीशक्तीचा सन्मान करणे हे आमचे कर्तव्य आहे. मात्र, काही पक्ष महिला आरक्षणाला अडथळा निर्माण करत आहेत. हा केवळ विधेयकाचा विरोध नसून संपूर्ण स्त्रीशक्तीचा अपमान आहे. हा अपमान भाजप सहन करणार नाही," असा ठाम इशाराही यावेळी देण्यात आला. दरम्यान, मुंबईतील जी. एम. भोसले मार्ग परिसरात महिलांची मोठी गर्दी उसळली असून, आंदोलनादरम्यान विरोधकांविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात येत आहे.

या प्रसंगी संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, महिला मोर्चा अध्यक्षा सुजाता पालांडे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, विविध पदाधिकारी आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून पुन्हा एकदा राजकीय वातावरण तापले असून, या आंदोलनामुळे राज्यभरात या विषयावर चर्चा रंगण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### नारीशक्तीचा 'आक्रोश'

पिंपरी-चिंचवडमधील शेकडो महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या मुंबईतील आक्रोश आंदोलनात सहभागी झाल्या असून महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांविरोधात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. महिला सन्मान आणि अधिकारांच्या रक्षणासाठी रस्त्यावर उतरल्याचे सांगत, "ही लढाई केवळ आरक्षणाची नाही तर स्वाभिमानाची आहे," असा ठाम संदेश देण्यात आला. आंदोलनादरम्यान घोषणाबाजी करत विरोधकांवर टीका करण्यात आली असून, नारीशक्तीचा अपमान सहन केला जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला.

> "नारीशक्तीचा अपमान करणाऱ्यांना आता शब्दांनी नाही, तर रस्त्यावर उतरून उत्तर दिलं जाईल. महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांनी लक्षात ठेवावं—ही लढाई केवळ अधिकारांची नाही, तर स्वाभिमानाची आहे. पिंपरी-चिंचवडची नारीशक्ती गप्प बसणार नाही; अन्याय करणाऱ्यांना जाब विचारल्याशिवाय थांबणार नाही!"
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### महिला आरक्षणावरून राजकीय वातावरण तापले

महिला आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यभरात राजकीय वातावरण पुन्हा तापले असून विविध पक्षांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. पिंपरी-चिंचवडमधील महिलांच्या मोठ्या सहभागामुळे या आंदोलनाची राज्यभर दखल घेतली जात आहे. नारीशक्तीच्या सन्मानासाठी उभा राहिलेला हा आवाज पुढील काळात अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.



# एमआयडीसीतील पाणी, स्वच्छता व रस्ते प्रश्न तातडीने सोडवणार; आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

## लघुउद्योग व उद्योग संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत विशेष बैठक

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**एमआयडीसी परिसरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते दुरुस्ती, घातक कचरा व्यवस्थापन तसेच लघुउद्योगांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल. उद्योगधंद्यांना सक्षम, सुरक्षित आणि विकासपूरक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. एमआयडीसी भागांचा सर्वांगीण विकास हा महापालिकेचा प्राधान्यक्रम असून, मूलभूत सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा आणि कामांची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येईल, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात शहरातील लघुउद्योग संघटना तसेच एमआयडीसीमधील विविध उद्योग संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत विशेष बैठक आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याबैठकीत औद्योगिक क्षेत्रासमोरील मूलभूत सुविधा, स्वच्छता, पायाभूत विकास आणि प्रशासकीय समन्वय यासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान उपस्थित पदाधिकाऱ्यांनी परिसरातील पाणीटंचाई, कचरा संकलनातील अडचणी, झाडलोट, खराब रस्ते, वाहतूक समस्या आणि घातक कचरा व्यवस्थापनाबाबत विविध मुद्दे मांडले.

यावेळी पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे यांनी औद्योगिक क्षेत्रासमोरील विविध समस्या, प्रलंबित प्रश्न तसेच एमआयडीसी परिसरातील पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि मूलभूत सुविधांबाबतच्या मागण्या आयुक्तांसमोर सविस्तर मांडल्या. उद्योग क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासनाने ठोस, नियोजनबद्ध आणि तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी, मनोज सेठिया, उपायुक्त सिताराम बहुरे, व्यंकटेश दुर्वास, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अतुल पाटील, अजिंक्य येळे, परशुराम वाघमोडे, निवेदिता घार्गे, अग्निशमन अधिकारी ऋषिकांत चिपाडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सीएसआर सेलचे मुख्य समन्वयक विजय वावरे, श्रुतिका मुंगी यांच्यासह लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष अभय भोर, पिंपरी चिंचवड लघु उद्योग संघटना अध्यक्ष संदीप बेलसरे, उपाध्यक्ष संजय जगताप, संजय सातव, नवनाथ वायाळ, डी. के. साळुंखे, तात्यासाहेब सपकाळ, नवनाथ बडे, मकरंद सदरे, बी. जी. औटी तसेच महिला लघुउद्योग संघटनेच्या दुर्गा भोर, जयश्री साळुंखे, रेश्मा मुल्ला, स्वाती मगर, वैभव जगताप आदी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी एमआयडीसी परिसरात नियोजनबद्ध आणि नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी संबंधित विभागांना तातडीच्या सूचना दिल्या. तसेच कचरा विलगीकरण, वेळेत कचरा संकलन आणि दैनंदिन स्वच्छता मोहिमेवर विशेष भर देत परिसर अधिक स्वच्छ व सुव्यवस्थित ठेवण्याचे निर्देश दिले. लवकरच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत एमआयडीसी परिसराचा प्रत्यक्ष पाहणी दौरा करून समस्यांचा आढावा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

औद्योगिक भागातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती, खड्डेमुक्त रस्ते, सुकर वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षित औद्योगिक वातावरण निर्मितीसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने हाती घेण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. घातक कचऱ्याच्या शास्त्रोक्त विल्हेवाटीसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली.

उद्योग क्षेत्राच्या समस्या प्रलंबित राहू नयेत यासाठी दर महिन्याला नियमित आढावा बैठक घेण्यात येईल. 'उद्योग सारथी' या उपक्रमाच्या माध्यमातून उद्योग संघटना आणि प्रशासन यांच्यात सातत्यपूर्ण संवाद ठेवून स्थानिक पातळीवरील प्रश्नांना प्राधान्याने मार्गी लावण्यात येईल. शहरातील उद्योगवाढीस गती देण्यात येईल, असेही आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सांगितले. याशिवाय पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता तसेच, महिलांसाठी सुरक्षित सार्वजनिक प्रवास सुविधा आणि स्वच्छतागृहांची उपलब्धता याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.

# पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणच्या 'स्ट्रक्चरल प्लॅन'वर आक्षेप!

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पीएमआरडीए ने कोट्यावधी रुपये खर्च करून तयार केलेला व नंतर रद्द केलेला बेकायदेशीर प्रारूप विकास आराखड्यामधील झालेल्या चुका दुरुस्त करून घ्याव्यात. हे कमी खर्चात आणि कमी वेळेत होऊ शकते मात्र तसे न करता प्रशासनाचा हट्ट स्ट्रक्चरल प्लॅनसाठी का आहे असा प्रश्न पुणे महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंत भसे यांनी उपस्थित केला.**



तसेच सध्या अस्तित्वात असणाऱ्या महानगर नियोजन समितीमध्ये (एमपीसी) अद्यापही २३ जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या असून त्यातून रिक्त असणाऱ्या २३ जागा भराव्यात आणि पुढील काळात एमपीसी च्या अधिकारातच सर्व विकास योजना राबवण्यात व घटनेने दिलेल्या एमपीसी च्या अधिकारांची अंमलबजावणी करावी अशी ही मागणी यावेळी भसे यांनी केली.

सोमवारी (दि.२०) पिंपरी ते आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भसे बोलत होते. यावेळी ॲड. उमेश तारे, जमीन हक्क परिषद पुणे जिल्हा अध्यक्ष सुभाष धामणकर, तळेगाव दाभाडे माजी नगराध्यक्ष कृष्णाजी काटके, बाधित शेतकरी बाबासाहेब बुधुडे आदी उपस्थित होते.

यावेळी वसंत भसे यांनी सांगितले की, महानगर नियोजन समितीचे अध्यक्ष मुख्यमंत्री आहेत. अगोदर केलेला प्रारूप विकास आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केल्याची जाहीरपणे घोषणा करून तसे आदेश दिलेले आहेत. परंतु प्रशासन मात्र त्यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आहे. नगर विकास खात्यातील काही अधिकारी आपल्या मर्जीने काम करीत आहेत. २०१३ मध्ये दहा किलोमीटर क्षेत्राचा विकास आराखडा केलेला असताना ती माहिती मुख्यमंत्र्यांपासून दडवून ठेवून स्ट्रक्चरल प्लॅनचा आग्रह अधिकारी कशासाठी करत आहेत.

या स्ट्रक्चरल प्लॅन मुळे बाधित शेतकऱ्यांच्या जागा रस्त्यासाठी घेऊन त्यांना मोबदला अथवा परतावा कसा देणार याचे स्पष्ट धोरण नाही. त्यामुळे लाखो शेतकरी विस्थापित होऊन देशोधडीला लागतील, शेतकरी भूमिहीन होऊन उद्योजक आणि बिल्डरांचे खिसे भरले जातील. हा सर्वसामान्य शेतकऱ्यांचा आवाज उठवण्यासाठी वेळोवेळी कमिटीच्या वतीने पत्रव्यवहार करून देखील प्रशासनाचे डोळे उघडत नाहीत, म्हणून पुन्हा मा. उच्च न्यायालयात जावे लागले आहे असे भसे यांनी सांगितले.

# हिंदू धर्म म्हणजे ईश्वराच्या प्राप्तीचे सायन्स; कालीचरण महाराज

## हिंदू राष्ट्रासाठी संघटित होण्याचे आवाहन : चिखलीत प्रथमच भव्य दिव्य 'विराट हिंदू संमेलन'

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**हिंदू धर्म वाचवणे ही सर्वांची जबाबदारी आहे. धर्म म्हणजे ईश्वराच्या प्राप्तीचे सायन्स असून हिंदू राष्ट्रासाठी संघटित होण्याचे आवाहन प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित असलेल्या कालीपुत्र कालिचरण महाराज यांनी हिंदू बांधवांना केले.नेवाळे वस्तीतील धर्मरक्षक भुजबळ प्रांगणात पार पडलेल्या विराट हिंदू संमेलनात ते (दि.१९) बोलत होते.या संमेलनाला चिखली आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील हरिपाठ व भजनी मंडळे, सर्व महिला बचत गट, सामाजिक संस्था, ज्येष्ठ नागरिक संघा सहित हजारो हिंदू बांधव, माता-भगिनी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



यावेळी कालिचरण महाराज म्हणाले की,भारताला 'हिंदू राष्ट्र' बनवणे ही काळाची गरज आहे. डाळ-तांदळाच्या भावासाठी रडणारी 'भिकारचोट' वृत्ती सोडली पाहिजे. हिंदूंनी आर्थिकदृष्ट्या सक्षम होऊन श्रीमंत व्हावे, तरच देश आणि धर्म श्रीमंत होईल."डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ८० वर्षांपूर्वीच मुसलमानांच्या निष्ठेवर आणि शरीया कायद्यावर भाष्य केले होते. त्यांचे पुस्तक वाचून त्यांचा भक्त झालो आहे. मुसलमानांची पहिली निष्ठा त्यांच्या धर्माशी आणि जिथे इस्लामिक सत्ता आहे त्या देशाशी असते, हे आंबेडकरांचे विधान आजही तंतोतंत लागू पडते. आपल्याला अर्धेच वाक्य शिकवून नपुंसक बनवण्यात आले आहे. महाभारतातील पूर्ण श्लोक 'अहिंसा परमो धर्म:, धर्म हिंसा तथैव च' असा आहे.दुष्टांचा संहार करणे हाच खरा धर्म आहे. श्रीराम, श्रीकृष्ण आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शस्त्रास्त्रांचा दाखला देत त्यांनी हिंदू धर्माच्या शौर्याची आठवण करून दिली.

'लव्ह जिहाद', 'लँड जिहाद' आणि 'जिम जिहाद' यांसारख्या संकटांपासून सावध राहिले पाहिजे. तसेच, हलाल उत्पादनांवर बहिष्कार टाकून हिंदूंच्याच व्यापाराला प्राधान्य दिले पाहिजे.आपल्या मुलींच्या हातात स्वसंरक्षणासाठी शस्त्रे असावीत.भ्याड मृत्यू पत्करण्यापेक्षा धर्मासाठी योद्धा म्हणून मरा. जर मरायचेच असेल तर नथुराम गोडसे यांच्यासारखे देशद्रोह्याला मारून मरा, जेणेकरून लोक तुमचा उदो-उदो करतील.उपस्थित जनसमुदायाने 'जय श्री राम' आणि 'ओम काली'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला."जो धर्माचे रक्षण करतो, त्याचे रक्षण धर्म करतो," असे मत कालिचरण महाराजांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संयोजक दत्तात्रय ढोले पाटील हे प्रस्तावना सादर करतांना म्हणाले की, "हे संमेलन म्हणजे केवळ एक कार्यक्रम नसून आपल्या अस्मितेचा, एकतेचा आणि विजयशक्तीचा जागर आहे. नेवाळे वस्तीची ही पावन भूमी नेहमीच संस्कार आणि धर्मरक्षणासाठी अग्रेसर राहिली आहे. आज आपण सर्व जातीपातीचे भेद आणि भिंती गाडून केवळ 'हिंदू' म्हणून येथे एकत्र आलो आहोत, हेच या संमेलनाचे सर्वात मोठे यश आहे." 'संघशक्ती कलौयुगे' या संस्कृत वचनाचा आधार घेत त्यांनी कलियुगात संघटन हीच सर्वोच्च शक्ती असल्याचे अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजाराम सावंत तर आभार अनुपमाताई पाटील यांनी मानले.

### 'सिंगल युज प्लास्टिक'चा त्याग करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य

सामाजिक पंच परिवर्तनावर बोलतांना अविनाश भेगडे म्हणाले की,"देशावर जेव्हा संकट येईल तेव्हा आपण आपली वैयक्तिक कारणे बाजूला ठेवून सक्रिय होणार का? उंदरांच्या गोष्टीप्रमाणे मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्याची जबाबदारी टाळून देश मोठा होणार नाही. प्रत्येकाने रोज देशासाठी थोडे तरी काम केले पाहिजे, तरच भारत बलशाली होईल.डॉ हेडगेवारांनी जात-पात विसरून सर्व हिंदूंना एकत्र आणण्यासाठी १९२५ मध्ये संघाची स्थापना केली. "संघाला कोणतेही श्रेय नको आहे. ज्या दिवशी हिंदू समाज स्वतःचे प्रश्न सोडवण्यास सक्षम होईल आणि सुसंघटित होईल, त्या दिवशी संघाचे कार्य पूर्ण होईल. 'ग्लोबलायझेशन'मुळे आपली कुटुंब व्यवस्था उद्ध्वस्त होत आहे. मोबाईलचे व्यसन सोडून आठवड्यातून एकदा तरी कुटुंबाने एकत्र बसून संवाद साधला पाहिजे आणि मुलांवर संस्कार केले पाहिजेत.पाण्याचा जपून वापर करणे, वृक्षारोपण करणे आणि 'सिंगल युज प्लास्टिक'चा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे प्रतिपादन भेगडे यांनी केले.

# क्रांतिवीर चापेकर स्मारकामुळे देशप्रेमाची प्रेरणा : आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**क्रांतिवीर चापेकर राष्ट्रीय संग्रहालयाचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्यात येईल. ही वास्तू प्रत्येकाला देशप्रेमाची प्रेरणा देणारी ठरेल, असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.**



आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पत्नी डॉ. आरती सूर्यवंशी यांच्यासह अक्षय्य तृतीया तसेच नुकत्याच झालेल्या क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर यांच्या १२८ व्या स्मृतिदिनानिमित्त चिंचवड येथील क्रांतिवीर चापेकर बंधू राष्ट्रीय संग्रहालय 'क्रांतितीर्थ' येथे भेट दिली. यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी क्रांतिवीर चापेकर स्मारक समितीचे अध्यक्ष पद्मश्री गिरीश प्रभुणे, कार्यवाह अ‍ॅड. सतीश गोरडे, अतुल आडे, महापालिका उपायुक्त पंकज पाटील तसेच थर्ड आय स्टुडिओच्या मैथिली कुलकर्णी उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यावेळी म्हणाले, 'अक्षय्य तृतीया आणि नुकत्याच झालेल्या क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर यांच्या स्मृतिदिन (१८ एप्रिल) निमित्त क्रांतितीर्थाला सपत्नीक भेट देण्याचा योग आला. एका प्रेरणादायी, क्रांतिकारी, राष्ट्रप्रेमी कुटुंबाच्या वाड्याला पाहून मन भारावून गेले. लहानपणी क्रांतिवीर चापेकर बंधू यांच्या बलिदानाचा जाज्वल्य इतिहास ऐकला होता, तो संग्रहालयाच्या माध्यमातून प्रत्यक्ष अनुभवता आला. या वास्तूमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला देशप्रेमाची शिकवण मिळेल, अशी खात्री आहे,' असे देखील त्यांनी सांगितले.

या संग्रहालयाचे उर्वरित काम तातडीने पूर्ण होईल, असा विश्वास आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी व्यक्त केला. तसेच चापेकर वाडा येथील प्रलंबित कामाचा आढावा घेऊन उर्वरित कामे तात्काळ मार्गी लावण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.



# शहरातील पाणीपुरवठा २८ एप्रिलला बंद!

## महापालिका प्रशासनाची माहिती : २९ एप्रिलला सकाळी कमी दाबाने पाणी

**महाईन्यूज |**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी जलशुद्धीकरण केंद्र येथे करण्यात येणाऱ्या स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीच्या कामामुळे मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.**



तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवार, दिनांक २९ एप्रिल २०२६ रोजी सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल. तरी नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा पुरेसा साठा करून काटकसरीने वापर करून सहकार्य करावे, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या पाणीपुरवठा व्यवस्थेमध्ये खंड पडू नये, यासाठी वेळोवेळी पाणीपुरवठा यंत्रणेची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक असते. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत से.क्र.२३ येथील तसेच क्षेत्रीय स्तरावरील स्थापत्य व विद्युत विषयक देखभाल-दुरुस्तीची कामे हाती घेण्यात येणार आहेत. या कामांसाठी २८ एप्रिल २०२६ रोजी निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे २८ एप्रिलला पिंपरी चिंचवड शहरातील सर्व भागांचा सायंकाळचा पाणीपुरवठा बंद राहणार असून २९ एप्रिलला सकाळचा पाणीपुरवठा अनियमित व कमी दाबाने होईल.

> निगडी जलशुद्धीकरण केंद्रावरील देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी २८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी पाणीपुरवठा बंद राहणार असल्याने नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा पुरेसा साठा करून उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व नियोजनबद्ध वापर करून सहकार्य करावे. देखभाल-दुरुस्तीची सर्व कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन प्रयत्नशील राहील.
>
> **– प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

# पावसाळ्यापूर्वीची कामे हाती घ्या; शिवसेना खासदार श्रीरंग बारणे

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषद आणि वडगाव नगरपंचायतीच्या हद्दीत सुरु असलेल्या विकास कामांना गती द्यावी. उन्हाळा सुरु असल्याने पुरेशा प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करावा. पाण्याच्या तक्रारी येऊ देऊ नका, पावसाळ्यापूर्वीची कामे हाती घ्यावीत. प्रलंबित कामांचे प्रस्ताव तयार करुन राज्य शासनाकडे पाठवावेत. त्याला मान्यतेसह निधी मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी दिली.**



मावळ लोकसभा मतदारसंघातील लोणावळा, तळेगाव दाभाडे नगरपरिषद आणि वडगाव नगरपंचायतीच्या कामासंदर्भात खासदार बारणे यांनी सोमवारी आढावा बैठका घेतल्या. आमदार सुनील शेळके, तिन्ही नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, संबंधित विभागाचे सर्व अधिकारी बैठकांना उपस्थित होते. केंद्र, राज्य सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. तिन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांना मोठ्या प्रमाणात खासदार निधी उपलब्ध करुन दिला आहे. भविष्यातही निधीची कमतरता भासू दिली जाणार नसल्याची ग्वाही खासदार बारणे यांनी दिली.

लोणावळ्यातील बैठकीला नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, उपनगराध्यक्ष देविदास कडू, सनी दळवी, दिपा आगरवाल, धनंजय काळोखे, जीवन गायकवाड, स्वप्ना कदम, सनी घोणे, मुकेश परमार, दत्तात्रय येवले, शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, उप तालुका प्रमुख सोमनाथ कोंडे, मदन शेडगे, शिवसेना लोणावळा शहर प्रमुख संजय भोईर, शिवसेना महिला लोणावळा शहर संघटिका मनीषाताई भांगरे, युवासेना मावळ लोकसभा अध्यक्ष विशाल हुलावळे, शिवसेना लोणावळा उप शहर प्रमुख विशाल पाठारे, वडगाव नगरपंचायतीमधील बैठकीला उपनगराध्यक्ष सुनिल ढोरे, विरोधी पक्षनेत्या अर्चनाताई म्हाळस्कर, मुख्याधिकारी प्रवीण निकम, युवासेना तालुका प्रमुख विशाल आणि तळेगावमधील बैठकीला नगराध्यक्ष संतोष दाभाडे, मुख्याधिकारी गिरीश दापकेकर, माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी उपस्थित होते.

वडगावमधील पोटोबा देवस्थान लगत असलेल्या तलावाचे सुशोभीकरण करावे. क्रीडांगण विकसित करावे. अमृत भारत योजनेअंतर्गत एसटीपी प्रकल्प उभारण्यासाठीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविण्यात यावा. तळेगाव दाभाडे शहरातील पाणीपुरवठा योजनेला मान्यता मिळाली आहे. योजना राबविण्यासाठी ११६ कोटी रुपये लागणार आहेत. त्यासाठी नगरविकास विभागाकडून निधी उपलब्ध करुन दिला जाईल. तिन्ही नगरपरिषद, पंचायतीच्या हद्दीमध्ये क्रीडांगणे, ओपन जीम, शाळांसाठी स्मार्ट बोर्ड सीएसआरमधून उपलब्ध करुन दिले जातील. सुरु असलेल्या सर्व कामांना गती द्यावी. तीन महिन्यांनी पुन्हा आढावा घेण्यात येईल, असेही खासदार बारणे यांनी सांगितले.

### भुशी डॅमकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण

लोणावळा पर्यटननगरी आहे. देशभरासह राज्यातील पर्यटक लोणावळ्यात येतात. भुशी डॅमकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करावे. पावसाळ्यापूर्वीच्या कामांना गती द्यावी. नालेसफाई करावी. पावसाळ्यात कोठेही पाणी साचता कामा नये. पर्यटकांना त्रास होता कामा नये. पर्यटकांमुळे अर्थकारणाला चालना मिळते. त्यांना सर्व सुविधा दिल्या पाहिजेत. लोणावळ्या रेल्वे स्थानक परिसरात पार्किंगची व्यवस्था करण्याची नागरिकांची मागणी आहे. याबाबत रेल्वे विभागाबरोबर बैठक घेऊन निर्णय घेण्यात येणार आहे. पर्यटननगरीसाठी राज्य सरकारकडून मोठा निधी मिळतो. त्याचा योग्य विनियोग करुन नियोजनबद्ध कामे करावीत, अशी सूचना खासदार बारणे यांनी दिली.

### खंडाळ्यातील उड्डाणपुलाची डागडुजी

रेल्वे विभागाच्या प्रलंबित कामांनाही केंद्र सरकारच्या माध्यमातून गती दिली आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाला मान्यता मिळाली आहे. रेल्वेचे काम अंतिम टप्प्यात असून नगरपरिषदेने रस्त्याच्या कामाला गती द्यावी. नगरपरिषदेने त्याचा आढावा घेऊन काम मार्गी लावावे. पंतप्रधान आवास योजनेच्या माध्यमातून काही घरकुलांना मान्यता मिळाली आहे. त्यासाठीची जागा निश्चित करुन घरे बांधण्याला गती द्यावी. पुणे-मुंबई रस्ता लोणावळ्यातून जातो. या रस्त्याची देखभाल, दुरुस्ती एमएसआरडीसीकडे आहे. खंडाळ्यातील उड्डाणपुलाची डागडुजी, सुशोभीकरण करण्याच्या सूचना खासदार बारणे यांनी एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

# ‘कृष्णा’ कारखान्याची आधुनिकतेकडे झेप!

## १६०० मीटर धावताना २३ वर्षीय उमेदवार कोसळला; पोलीस होण्याचे स्वप्न अधुरे

**महाईन्यूज । सातारा**

**सहकार क्षेत्रातील शिरोमणी असलेल्या यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याने काळाची पावले ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचा निर्णय घेतला आहे. कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले आणि आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्या दूरदृष्टीने आता उसाचे उत्पादन वाढवण्यासाठी ‘कृत्रिम बुद्धिमत्ता’ (AI) तंत्रज्ञानाचा वापर आणि जुन्या जलसिंचन योजनांचे पूर्णपणे सक्षमीकरण केले जाणार आहे. या निर्णयामुळे सभासद शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धीचे नवे पर्व सुरू होणार आहे.**



परंपरागत शेती पद्धतीत वाढणारा मजुरी खर्च आणि निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी अडचणीत येत आहे. यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून ‘कृष्णा’ने आता उसाच्या शेतीमध्ये एआय (AI) तंत्रज्ञान आणण्याचे निश्चित केले आहे. या आधुनिक तंत्रज्ञानामुळे जमिनीचा पोत, पिकाला आवश्यक असणारी खते आणि पाण्याची मात्रा याचे अचूक नियोजन संगणकीय प्रणालीद्वारे केले जाईल. हवामानाचा अचूक अंदाज घेऊन करावयाच्या उपाययोजनांमुळे उसाची उत्पादकता वाढेल आणि उत्पादन खर्च कमी होऊन शेतकऱ्यांच्या हातात चार पैसे जास्त शिल्लक राहतील.

कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील अनेक उपसा जलसिंचन योजना आता जुन्या झाल्या असून वाढत्या वीज बिलामुळे त्या सभासदांसाठी आर्थिक ओझे ठरत आहेत. डॉ. सुरेश भोसले यांनी या योजनांच्या आधुनिकीकरणाचा विडा उचलला आहे. नवीन पंपिंग यंत्रणा आणि सौर ऊर्जेचा वापर यावर भर देऊन या योजना येत्या वर्षभरात सक्षम केल्या जातील. यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील पाणीपट्टीचा भार हलका होणार असून, हक्काचे पाणी शेतापर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होईल.

### विकासाची ‘भोसले’ विचारधारा

‘कृष्णा’ कारखान्याच्या प्रगतीमध्ये डॉ. सुरेश भोसले यांचे अनुभवी मार्गदर्शन आणि आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांची युवा आणि आधुनिक कार्यशैली यांचा मोठा वाटा आहे. डॉ. सुरेश भोसले यांनी आपल्या प्रगल्भ विचारांतून कारखान्याला आर्थिक शिस्त आणि पारदर्शकता मिळवून दिली आहे, तर आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांनी आपल्या नेतृत्वातून तरुणांना आणि तंत्रज्ञानाला सहकाराशी जोडण्याचे काम केले आहे. या दोघांच्या सक्षम जोडीमुळेच ‘कृष्णा’ आज केवळ साखर कारखाना न राहता एक समृद्धी केंद्र बनले आहे. सभासदांचे हित जोपासत असतानाच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातही या नेतृत्वाने मोलाचा ठसा उमटवला आहे.

### पारदर्शक कारभार व विश्वासाचे नाते

गेल्या काही वर्षांत कारखान्याने चांगला दर देऊन सभासदांना आर्थिक स्थैर्य दिले आहे. केवळ गाळपाचे उद्दिष्ट न ठेवता, शेतकऱ्याच्या बांधावर आधुनिक तंत्रज्ञान कसे पोहोचेल, हाच ध्यास या व्यवस्थापनाने घेतला आहे. पारदर्शक कारभार आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड यामुळे ‘कृष्णा’ मॉडेल हे सहकार चळवळीसाठी आज दीपस्तंभ ठरत आहे.

